खेड तालुका शिक्षण प्रसारक मंडळाचे

# हुतात्मा राजगुरू महाविद्यालय राजगुरूनगर

ता. खेड, जि.पुणे

## भूगोल विभाग

## गाव सर्वेक्षण

हुतात्मा राजगुरू महाविद्यालयाच्या भूगोल विभागामध्ये अनेक प्रकारचे उपक्रम राबविले जातात. शनिवार दि. 1/03/2025 रोजी भूगोल विभागामध्ये गाव सर्वेक्षण हा उपक्रम राबिविला गेला. दरवर्षी हुतात्मा राजगुरू महाविद्यालयातील विद्यार्थी गाव सर्वेक्षण करतात. गेल्या वर्षी शैक्षणिक वर्ष 2024–23 मध्ये एस.वाय.बी.ए.च्या विद्यार्थ्यांनी बुरसेवाडी आणि टी.वाय.बी.ए. च्या विद्यार्थ्यांनी गुंडाळवाडी या गावांचे सर्वेक्षण केले. या शैक्षणिक वर्षात म्हणजे 2024–25 मध्ये भूगोल विभागाच्या विद्यार्थ्यांनी खरपुडी खुर्द या गावाचे सर्वेक्षण केले.

खरपुडी खुर्द हे गाव खेड तालुक्याच्या आग्नेयेस 6 कि. अंतरावर आहे. हे भीमा नदीच्या उजव्या काठावर नदीपासून एक कि.मी अंतरावर वसले आहे. भूगोल विभागातील जे विद्यार्थी सहलीसाठी आले नव्हते अशा विद्यार्थ्यांनी या गाव सर्वेक्षण उपक्रमामध्ये भाग घेतला. अशा सुमारे 23 विद्यार्थ्यांनी गाव सर्वेक्षणात सहभाग घेतला.

शनिवारी सकाळी 8.00 वा एस.टी. ने आणि आणि आपापल्या वाहनांनी विद्यार्थी आणि विद्यार्थीनी खरपुडी खुर्द येथे आले. नंतर त्यांना मोबाईलवर ऑनलाईन सर्वेक्षण कसे करावे याविषयी डॉ.दिलीप मुळूक यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. त्यानंतर दोन किंवा तीन विद्यार्थ्यांचे एक एक असे गट तयार करून विद्यार्थ्यांना वेगवेगळ्या गल्ल्यांमध्ये पाठविले. विद्यार्थ्यांनी घरोघरी जाऊन सर्वेक्षण केले. हा डाटा मोबाईलवर ऑनलाईन संग्रहीत करण्यात आला. मोबाईलवर ऑनलाईन सर्वेक्षण केल्यानंतर हे सर्व विद्यार्थी ग्रामपंचायत कार्यालयाजवळ एकत्र आले. तेथे प्राध्यापक आणि विद्यार्थ्यांनी ग्रामपंचायत कार्यालयातून महत्वाची माहिती घेतली. तेथे खरपुडी खुर्द ग्रामपंचायतचे सरपंच सौ नंदा गाडे उपस्थित होत्या. त्यांनी विद्यार्थ्यांना आणि प्राध्यापकांना सर्व प्रकारची माहिती दिली. तेव्हा सर्व विद्यार्थ्यांचा आणि प्राध्यापकांचा सरपंचांबरोबर फोटो घेतला.

यानंतर दुपारच्या जेवणासाठी टेकडीवर खंडांबामंदिर येथे विद्यार्थ्यांना नेले. तेथे सर्वांनी एकत्रित जेवणाचा आस्वाद घेतला आणि हा गाव सर्वेक्षण उपक्रम संपूर्ण झाला.

या गाव सर्वेक्षणासाठी प्राचार्य डॉ. शिरीष पिंगळे यांनी परवानगी दिली. विभागप्रमुख डॉ. दिलीप मुळूक यांनी मार्गदर्शन केले. डॉ. डी.एम.मारकड आणि प्रा. एम.एल.मुळूक यांनी प्रत्यक्ष कार्यवाही केली.




गाव सर्वेक्षण उपक्रमामध्ये शेत शिवारात आनंद घेताना आणि निरीक्षण करताना विद्यार्थीनी




खरपुडी खुर्द ग्रामपंचायतीच्या समोर माहिती घेताना विद्यार्थी विद्यार्थीनी




खरपुडी खुर्द गावातील नागरिकांसमवेत चर्चा करताना प्रा. मच्छिंद्र मुळूक




खरपुडी खुर्द गावातील शाळेतील शिक्षक विद्यार्थ्यांना अध्यापन करताना.




खरपुडी खुर्द गावातील शाळेतील विद्यार्थी

विभाग प्रमुख
भूगोल विभाग
हुतात्मा राजगुरु महाविद्यालय
राजगुरुनगर, (खेड) जि. पुणे.

डॉ. शिरीष पिंगळे
प्राचार्य
हुतात्मा राजगुरु महाविद्यालय
राजगुरुनगर, ता. खेड, जि. पुणे.